महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

संचालनालय, लेखा व कोषागारे

ठाकरसी हाऊस,३ रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट,

जे. एन.हेरेडिया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्र.२२६२२०२९/२०३६/६२९१ E-mail- aao.prashakosha-mh@gov.in


---

**संदर्भ-** १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही 2015/ प्र. क्र. 303/ का.12, दि.12.09.2016.

२. म.शा.सा.प्र.वि.शा नि क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07.05.2021

*************

क्र. संलेको/प्रशा कोषा/२०२२/ स.अ./कार्या.३/नाईक पदोन्नती-2022/ १०७ दि. 01 FEB 2022

**विषय : शिपाई संवर्गातून "नाईक" संवर्गात पदोन्नती.**

**// आदेश//**

संचालनालयाच्या आस्थापनेवरील शिपाई संवर्गातील [वेतन स्तर S-1 रु.15,000-47,600/-] कर्मचाऱ्यांना **"नाईक"** संवर्गाच्या [वेतन स्तर S-3 रु.16,600-52,400/-] पदावर खालील अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व कार्यालयाचे नाव | पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेले कार्यालय |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री.मं.ग.खेडेकर संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई | संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई |

**अटी व शर्ती:-**

१. श्री.मं.ग.खेडेकर,शिपाई यांना मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार तसेच सामान्य प्रशासन विभाग दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय,

मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन उपरोक्त विवरणपत्रातील कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

२. श्री.मं.ग.खेडेकर,शिपाई यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत हजर व्हावे. विहित कालावधीत हजर न झाल्यास त्यांना ही पदोन्नती स्विकारण्यामध्ये स्वारस्य नाही असे समजून त्यांच्या पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील.

३. श्री.मं.ग.खेडेकर,शिपाई यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास संदर्भ क्र. १ वरील दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयात आदेशित केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

४. श्री.मं.ग.खेडेकर,शिपाई यांना त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्याकरीता तात्पुरती स्थानिक व्यवस्था करुन त्वरित कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व त्यांनी पदोन्नतीच्या पदावर हजर झाल्याचा अहवाल कार्यालय प्रमुखांनी या संचालनालयास तात्काळ पाठवावा.

५. श्री.मं.ग.खेडेकर,शिपाई यांना यापूर्वी आश्वासित प्रगती योजनेचा लाभ लागू केलेला असल्याने या पदोन्नतीमुळे त्यांचे पुन्हा वेतन निश्चिती होणार नाही.

**(वैभव राजेघाटगे)**
संचालक ,लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य ,मुंबई

**प्रत :**

१. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२. लेखा अधिकारी (र व का), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.(२ प्रती)
३. श्री.मंगेश खेडेकर, शिपाई
४. वैयक्तिक नस्ती.
५. निवड नस्ती प्रशा-कोषा शाखा.